| | |
|---|---|
| MHJN020004002020 | नियमित दिवाणी दावा क्र.१०३/२०२०<br>शेख कय्युम वि. शेख अजीज व इतर<br>CNRMHJN020004002020 |

**निशाणी क्रमांक १३ वरील आदेश**

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ५, ७ व १० तर्फे दाव्याची कैफियत देणेकामी झालेला उशीर माफ होवून दाव्याची कैफियत देण्यास परवानगी मिळणेकामी सादर केला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे –

प्रतिवादींना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. त्यास कारण प्रतिवादी बाहेरगावी गेले. प्रतिवादींना कैफियत देण्यास ३६ दिवसांचा उशीर झाला आहे. सदरचा उशीर माफ होऊन प्रतिवादींना कैफियत देण्यास परवानगी मिळणे जरुरची आहे. त्यासाठी प्रतिवादींनी परवानगी मागितली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) वादीतर्फे सदर अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे. अर्जातील सर्व विरोधी कथने वादीने नाकारले आहे. प्रतिवादींना पुरेशी संधी कैफियत देण्याकरिता दिली गेली आहे. अर्जातील कारण योग्य नाही. त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा.

४) प्रतिवादी क्र.१ ते ५, ७, १० व वादीतर्फे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) प्रतिवादींतर्फे कैफियत देण्यास झालेला उशीर माफ होऊन कैफियत देण्याची परवानगी त्यांनी मागितली आहे. प्रतिवादी बाहेरगावी गेल्याने त्यांना दाव्यात वेळेत कैफियत दाखल करता आली नाही असे कारण अर्जात नमूद केले आहे. प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास ३६ दिवसांचा विलंब झाला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. वादीतर्फे अर्जास दर्शविलेला विरोध विचारात घेता अर्जातील कारण योग्य नाही असे स्पष्ट केले आहे.

६) दाव्याचे अभिलेखानुसार प्रतिवादींना यांना दाव्याचे समन्सची बजावणी झाल्यानंतर त्यांनी विहीत मुदतीत आपली कैफियत दाखल केलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत देण्यास सात महिन्यापेक्षा जास्त उशीर झाला असल्याचे दिसून येते. प्रतिवादींतर्फे कैफियत देण्यास उशीर माफिचे अर्जातील नमूद कारण योग्य व संयुक्तिक नाही. तथापि, प्रतिवादी क्र.१ ते ५, ७ व १० यांची कैफियत दाव्याचे अभिलेखावर दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेकामी आवश्यक आहे. त्यासाठी प्रतिवादी क्र.१ ते ५, ७ व १० यांना कैफियत देण्यास झालेला उशीर त्यांनी वादीस खर्चापोटी रक्कम रुपये २५०/- प्रत्येकी देण्याचे अटीस अधीन राहून माफ करणे न्यायोचित होणार आहे. याकरीता सदरचा अर्ज खर्चाचे अटीस राहून मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | अर्ज निशाणी क्र.१३ प्रतिवादी क्र.१ ते ५, ७ व १० यांनी वादीस खर्चापोटी रक्कम |

| | |
|---|---|
| | रुपये २५०/– (अक्षरी दोनशे पन्नास रुपये मात्र) प्रत्येकी देण्याच्या अटीस राहून मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | परिणामतः प्रतिवादी क्र.१ ते ५, ७ व १० यांनी सादर केलेली दाव्याची कैफियत खर्चाच्या अटीचे पुर्ततेनंतर दाव्याच्या अभिलेखावर घेण्यात यावी. |

Digitally signed by
NANDAKUMAR
LAXMAN
YEOLEKAR
Date: 2022.08.04
17:34:54 +0530

(एन. एल. येवलेकर)

दिनांकः ०४/०८/२०२२

दिवाणी न्यायाधीश व.स्तर
जालना

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व.स्तर), जालना

दिनांक : ०४/०८/२०२२

सही/–
एम. डी. आढे
लघुलेखक (ग्रेड–३)